# <u>नियमीत दरखास्त क्र. ५०/२०१० मधील निशाणी ११० खालील आदेश</u>

**(चंद्रकांत व इतर विरूध्द जिल्हाधिकारी व इतर)**

प्रस्तुत अर्जाद्वारे दरखास्तदार चंद्रकांत व इतर यांनी वादग्रस्त मिळकतीचे ताबे मिळण्याकरीता बंधपत्र काढण्यात यावे अशी विनंती केली आहे.

२. दरखास्तदार यांचे विद्यमान वकीलांनी न्यायालयासमक्ष नमुद केले की, प्रस्तुत दरखास्त सन २०१० पासुन आजपावेतो न्यायप्रविष्ठ आहे. दरखास्तदार यांनी वादग्रस्त मिळकतीचा प्रत्यक्ष कब्जा मिळण्याकरीता वेळोवेळी तजविज घेउन कब्जा वारंट न्यायालयामार्फत काढण्यात आले. सदर वारंट माननीय दिवाणी न्यायालय क.स्तर नायगाव यांचे मार्फत अंमलबजावणीकरीता पाठविले असता संबंधीत न्यायालयामार्फत वारंट बजावणीचा अहवाल दाखल करण्यात आला नाही. तसेच संबंधीत न्यायालयाचे बेलिफामार्फत अंमलबजावणीकरीता रवाना करण्यात आले असता संबंधीत बेलिफ बजावणी करत नाही. अनेकवेळा वारंट बजावणीकरीता पाठविले असतांनासुध्दा त्याचा अहवाल या न्यायालयास प्राप्त होत नाही. तरी विनंती की, वादग्रस्त मिळकतीचे खुला ताबा मिळण्याकरीता पुन्हा वारंट काढण्यात यावे.

३. प्रस्तुत अर्जाचे अवलोकन केले. तसेच अभिलेखावर दाखल कागदपत्राचे वाचन केले असता प्रस्तुत दरखास्त सुमारे

५ वर्षापेक्षा जास्त कालावधीपासुन प्रलंबित आहे. तसेच दिनांक ०४.११.२०१७ रोजीचे निशाणी १०७ वरील आदेशान्वये मा. दिवाणी न्यायाधीश क.स्तर नायगाव यांच्याकडे कब्जे वारंट दिनांक १५.११.२०१७ रोजी या न्यायालयाचे जावक क्र. १५९८ अंमलबजावणीकरीता रवाना केले असता सदर वारंटचा अहवाल या न्यायालयात दाखल करण्यात आलेला नाही. तद्नंतर दिनांक १६.१२.२०१७ रोजीचे निशाणी ०१ वरील आदेशान्वये सहायक अधिक्षक, दिवाणी न्यायालय क.स्तर, नायगाव यांच्याकडे या न्यायालयाचे पत्र जावक क्र. १७८२/२०१७ दिनांक ०४.१२.२०१७ रोजी वारंट बजावणीचा अहवालाची मागणी केली असता संबंधीत सहायक अधिक्षक, दिवाणी न्यायालय, नायगाव यांचे पत्र जावक क्र. १७०३/२०१७ दिनांक १५.१२.२०१७ रोजी या न्यायालयास कळविले की, नियमीत दरखास्त क्र. ५०/२०१० चंद्रकांत विरूध्द शासन मधील ताबा वारंट प्राप्त झालेले नाही. त्याबाबत संबंधीत कनिष्ठ लिपीक यांचा दिनांक १५.१२.२०१७ रोजीचा अहवाल सोबत जोडला आहे. सदर अहवाल निशाणी १०८ वर दाखल आहे.

४. तद्नंतर अर्ज निशाणी १०९ वरील आदेशान्वये वादग्रस्त मिळकतीचा कब्जा मिळण्याकरीता वारंट या न्यायालयाचे नोंदणीकृत डाकेने या न्यायालयाचे पत्र जावक क्र. १८९१/२०१७ अन्वये दिनांक ३०.१२.२०१७ रोजी बजावणीकरीता मा. दिवाणी न्यायालय क.स्तर, नायगाव

यांच्याकडे पाठविण्यात आले. तसेच सदर वारंट प्रस्तुत अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे संबंधीत न्यायालयाचे बेलिफ श्री. गायकवाड यांच्यामार्फत बजावणी करण्याकरता रवाना करण्यात आले. परंतु, त्यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही, असे अर्जदार/दरखास्तदार यांनी प्रस्तुत अर्जामध्ये नमुद केले आहे.

५. माननीय नामदार मुंबई उच्च न्यायालय यांचे निर्देशानुसार पाच—दहा वर्षापेक्षा जास्त जुनी प्रकरणे तत्काळ चालवुन माहे मार्च २०१८ पर्यंत निकाली काढणे आवश्यक आहे. परंतु प्रस्तुत प्रकरणात माननीय दिवाणी न्यायालय क.स्तर, नायगाव यांच्याकडील संबंधीत कामगीरी करणारे बेलिफामार्फत वारंटची अंमलबजावणी होउन अहवाल या न्यायालयास प्राप्त होत नसल्याचे दिसुन येत आहे. त्याचप्रमाणे नोंदणीकृत डाकेने पाठविण्यात आलेला ताबे वारंट मा. दिवाणी न्यायालय क.स्तर, नायगाव यांचे न्यायालयात संबंधीत लिपीकास दिनांक ०१.०१. २०१८ रोजी प्राप्त झाल्याचे या न्यायालयातील जावक नोंदवहीतील नोंदीद्वारे आढळ होत आहे. तरीसुध्दा संबंधीत न्यायालयाचे बेलिफाने संबंधीत सहायक अधिक्षक यांच्या सहीनिशी वारंटचा अहवाल या न्यायालयात दाखल केला नाही. सदर बाब अत्यंत गंभीर स्वरूपाची असुन संबंधीत वारंटचे अंमलबजावणीकरीता हेतुपुरस्सर टाळाटाळ करीत असल्याचे अर्जदार यांचे विद्यमान वकीलांनी न्यायालयासमक्ष नमुद केले आहे. त्यामुळे माननीय दिवाणी न्यायालय, क.स्तर, नायगाव

यांच्यामार्फत संबंधीत कामगीरी करणारे बेलिफ गायकवाड यांना आणि उक्त न्यायालयाचे सहायक अधिक्षक यांना कारणे दाखवा नोटीस काढणे आवश्यक आहे. म्हणुन मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. श्री गायकवाड, बेलिफ, दिवाणी न्यायालय क.स्तर, नायगाव तसेच संबंधीत सहायक अधिक्षक, दिवाणी न्यायालय क.स्तर, नायगाव यांना याद्वारे कारणे दाखवा नोटीस काढण्यात येत असुन त्यांनी प्रस्तुत दरखास्तीमधील वारंटची अंमलबजावणी बाबतचा अहवाल वेळेत का दाखल करण्यात आला नाही, याबाबत लेखी खुलाशा नोटीस प्राप्त होताच तीन दिवसाच्या आत दाखल करण्याचे निर्देश देण्यात येत आहे.

२. सदर आदेशाची प्रत माननीय दिवाणी न्यायालय क.स्तर, नायगाव यांना योग्य त्या माहितीस्तव रवाना.

स्वाक्षरीत/—
(सतीश बा. हिवाळे)
दिनांक :— १९/०१/२०१८. दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
बिलोली.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file judgment are same, word to word, as per original Judgment.

Name of the Court :- Satish B. Hiwale
Civil Judge Senior Division, Biloli.

Name of Stenographer :- M.F.M. Sayyad.
Date of order :- 19-01-2018.
Order signed by the P.O. on :- 19-01-2018.
Judgment/Order uploaded on : 19-01-2018.